# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा. क्र. झोपुप्रा /मु.का.अ./झोपुयो स्विकृती/७४४/२०१८
दिनांक : ११/०४/२०१८

**कार्यालयीन आदेश**

**विषय :** झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकारण्याबाबत.

**संदर्भ :** कार्यालयीन आदेश क्र.- मु.का.अ./झोपुयो स्विकृती /६९९, दिनांक १६/१०/२०१७.

"Ease of Doing Business" द्वारे केंद्र शासनाने गृह बांधणीचे प्रस्ताव स्विकारण्याची कार्यपद्धती सुलभ केली असून महाराष्ट्र शासनाने सुद्धा २०२२ पर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचे उद्दीष्ट समोर ठेवले आहे. त्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय, निमशासकीय व खाजगी जमिनीवर असलेल्या झोपडपट्टयांचा विकास करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील अधिनियम ३३/१० व ३३/१४ अंतर्गत झोपडपट्टी पनुर्वसन प्राधिकरणाकडे स्विकृत केले जाणारे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव दाखल करण्याची कार्यपद्धती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुधारित परिपत्रके/कार्यालयीन आदेश या द्वारे निश्चित केलेली आहे.

२. सर्व विभाग प्रमुखांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय, संबंधित विभागाच्या कार्यकारी अभियंता, अभियांत्रिकी विभाग झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर संबंधित प्रस्तावाची छाननी करून प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारणे या बाबतची अंतिम कार्यवाही उपमुख्य अभियंता यांच्या स्तरावर करण्यात यावी, असे संदर्भाधिन परिपत्रकाद्वारे आदेश निर्गमित करण्यात आले होते.

३. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सहभागी असलेल्या विकासक/वास्तुशात्रज्ञ इत्यादींकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव स्विकारून त्यावर पुढील कार्यवाही करण्यासाठी विलंब होत असल्याच्या तक्रारी माझ्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन योजना जलद गतीने राबविणे व झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या गुणात्मक विकासाच्या दृष्टिकोनातून त्वरित निर्णय घेण्याच्या दृष्टिने Ease of Doing Business ची कार्यपद्धती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत अवलंबविण्यात यावी अशी PEAT, NERDECO, SLUM REDEVELOPER'S ASSOCIATION इत्यांदीनी प्रशासनाला विनंती केली आहे.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४००.०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

४. वरील सर्व गोष्टींचा विचार करता परिपत्रक १४४ व त्यानंतर वेळोवेळी पारित केलेले आदेश/परिपत्रके याद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३/१० व ३३/१४ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रस्तावांवर सर्व विभाग प्रमुखांच्या स्वयंस्पष्ट होकारार्थी/नाकारार्थी अभिप्राय संबंधित विभागांच्या कार्यकारी अभियंता अभियांत्रिकी विभाग, झोपडपट्टी पनुर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त झाल्यानंतर प्राप्त प्रस्तावांची छाननी करून प्रस्ताव स्विकारण्याबाबत उपमुख्य कार्यकारी अभियंता हे प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारणे यांचे अधिकार उपप्रमुख अभियंता यांच्याकडे देण्यात आले होते.

तथापि **सदर आदेशांमध्ये अंशत: बदल करून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त होणाऱ्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनांच्या प्रस्तावांना गती देण्यासाठी, आता, बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील नियम ३३/१० व ३३/१४ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या झोपडपट्टी पनर्वसन योजनांचे सदर प्रस्ताव उपप्रमुख अभियंता-१ यांच्याऐवजी संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंते प्रस्ताव स्विकारणे किंवा नाकारणे याबाबतचा अंतिम निर्णय त्यांच्या स्तरावर घेतील असे आदेश देण्यात येत आहेत.**

५. कार्यालयीन आदेश क्र.- मु.का.अ./झोपुयो स्विकृती /६९९, दिनांक १६/१०/२०१७. मध्ये वरील बदल सोडल्यास उर्वरीत आदेशांमध्ये कोणताही बदल नाही.

**सदर आदेश तात्काळ अमलात आणण्यात येत आहेत.**

(दीपक कपूर) ११/५/१८
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पनर्वसन प्राधिकरण

प्रत:-
१. सचिव, झोपुप्रा यांचे स्विय सहाय्यक
२. उप संचालक, नगर रचना, झोपुप्रा
३. वित्त नियंत्रक, झोपुप्रा
४. जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, झोपुप्रा
५. उप मुख्य अभियंता क्र.१ व २ झोपुप्रा
६. विधी सल्लागार,झोपुप्रा
७. उप जिल्हाधिकारी, झोपुप्रा, पुर्व उपनगरे पश्चिम उपनगरे मुंबई शहर
८. सहनिबंधक, झोपुप्रा
९. कार्यकारी अभियंता, क्र. १,२,३,४
१०. सहाय्यक निबंधक, झोपुप्रा
११. माहिती व तंत्रज्ञान विभाग, झोपुप्रा
१२. जनसंपर्क विभाग, झोपुप्रा
१३. मुख्य लिपिक/ अभियांत्रिकी विभाग, झोपुप्रा